# बुद्ध-बसव-फुले-आंबेडकर यांच्या जातीविषयक विचारातील साम्य

**श्रीमती थळकरी अश्विनी अशोक**
(सहशिक्षिका)
श्रीशैल मल्लीकार्जून विद्यामंदीर, कोळगाव समसापूर
जि. लातूर.

गौतम बुद्धांच्या काळात वर्णव्यवस्था होती. त्यावेळेस जातीव्यवस्था निर्माण झालेली नव्हती. जातिव्यवस्था ही बुद्धेत्तर कालीन रचना आहे. त्यामुळे गौतम बुद्धांचे जातिव्यवस्थेविषयक विचार व कार्य उपलब्ध होत नाही. तथागत बुद्धांच्या क्रांतीनंतर प्रतिक्रांती झाली. ह्या प्रतिक्रांतीचे एक प्रतिक म्हणजे जातिव्यवस्था होय.[1] असा विचार प्रतिपादन केला जातो.

बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी समाजात प्रचलित आणि प्रतिष्ठेचे लक्षण बनलेल्या जातीव्यवस्थेवर आपला विचार व कार्याच्या माध्यमातून आघात केले. त्यांच्या वचनातून त्यांच्या या महान कार्याचे प्रतिबिंब दिसून येते. बाराव्या शतकात बसवेश्वरांनी विविध जातीत खितपत पडलेल्या लोकांना बाहेर काढून लिंगायत धर्मात घेवून त्यांना जातीमुक्त केले. लिंगायत झालेला हा केवळ शरण होता. त्याला कुठलीच जात नव्हती. परिणामी त्या काळात समाजप्रवाहाच्या बाहेर खितपत पडलेल्या असंख्य लोकांचा उद्धार करून त्यांना समाजाच्या प्रवाहात आणून सोडले. लिंगायत धर्माच्या माध्यमातून अशा लोकांना खूप मोठा आधार दिला गेला. लिंग धारणेमुळे शरण बनलेल्या व्यक्तीत पुन्हा जात भेद करणे योग्य नाही. अशांना घोर नरक चूकणार नाही असे सांगताना बसवण्णा म्हणतात,

*"...आमच्या कुडलसंगाच्या शरणांच्यात जात भेद*
*करणाऱ्यांना कुंभीपातकी घोर नरक चूकणार नाही पहा"*[2]

*बसवेश्वरांच्या मते शिवभक्त हा सर्वात श्रेष्ठ असून त्याला जात-पात लागू होत नाही. तो फक्त शरण होतो. कारण शरणावर साक्षात देवाची कृपा होते. बसवण्णा म्हणत,*

*"लोखंड तापविणारा लोहार, कपडे धुणारा धोबी झाला*
*कापड विणणारा विणकर, वेदपाठ करणारा विप्र झाला"*[3]

बसवेश्वरांच्या मते, शिवभक्त हा सर्वात श्रेष्ठ असून त्याला जातपात लागू होत नाही. तो फक्त शरण होतो. कारण शरणावर साक्षात देवाची कृपा होते. बसवण्णा म्हणतात,

*"आद्याविना कोणी जाणत नाही, कोणी जाणत नाही*
*शिवभक्त हा श्रेष्ठ कुलीन आहे...*
*जात नाही, अजात नाही*
*कुडलसंगाचे शरण निस्सीम आहेत देवा."*[4]

समतावादाच्या पायावर उभारणी झालेला हा लिंगायत धर्म अल्पावधीतच लोकप्रिय होवून सर्वत्र प्रसार पावू लागला.

महात्मा फुले यांचे जाती व्यवस्थेविषयीचे विचार हे वर्णव्यवस्थेविषयी त्यांनी मांडलेल्या विचारांशी संबंधित आहेत. कारण वर्णव्यवस्थेतूनच पुढे अनेक जातींची निर्मिती झाली होती. महाराष्ट्रातील जाती संख्याविषयक विचार या संपादित पुस्तकाच्या प्रस्तावनेत प्रा. यशवंत सूमंत यांनी लिहिले की, "ब्राह्मणाचे कसब (1866), गुलामगिरी (1873) यासारख्या पुस्तकातून जोतीराव फुले यांनी महाराष्ट्रातील जातीविषयक प्रश्नांच्या गाभ्यालाच हात घातला आहे."[5] महात्मा फुलेंच्या म्हणण्यानुसार जातीव्यवस्था ही ईश्वरनिर्मित नसून मानवनिर्मित आहे. जातीची रचना ही स्वतः ब्राह्मणांनी केली. जातीव्यवस्था ही विषमतेवर आधारीत आहे. या व्यवस्थेने शुद्रातिशुद्र जातींचे शोषण केले. जातीव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी या व्यवस्थेस धर्माचा आधार दिला आणि त्यासाठी खोटे धर्मग्रंथ लिहिण्यात आले. अशा प्रकारे ब्राह्मण लोकांनी जातीव्यवस्था का निर्माण केली. याबाबतचे विचार अतिशय रोखठोकपणे मांडले. डॉ. उत्तमराव भोईटे यांनी नमुद केले की, "जातीसंस्थेची निर्मिती ब्राह्मणांनी आपले सामाजिक वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी व टिकविण्यासाठी केली असे फुल्यांचे प्रतिपादन होते."[6] परंतु केवळ सामाजिकच नाही तर धार्मिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी आणि

टिकविण्यासाठी जातीव्यवस्था निर्माण केली गेली असे व्यापक अर्थाने म्हणता येईल. जातीव्यवस्था ही कांही श्रम विभाजनाची व्यवस्था नाही, तर ती वंशपरंपरेने बहुसंख्यांक अशा शुद्र आणि अतिशुद्र समाजाला गुलामित ठेवण्याची व्यवस्था आहे ही गोष्ट फुले अतिशय स्पष्टपणे प्रतिपादित करतात. सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथात जातीभेद विषयावर फुलेंनी आपले विचार अतिशय स्पष्टपणे मांडले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातिव्यवस्थेचे विचार त्यांच्या 'जातिव्यवस्था निर्मूलन' ह्या संशोधनात्मक ग्रंथात अधिक स्पष्टपणे दिसून येतात. मुळात हा ग्रंथ म्हणजे बाबासाहेबांनी लाहोर येथील संमेलनात करावयाचे भाषण होते. या भाषणाचा मध्यवर्ती सिद्धांत स्पष्ट करताना बाबासाहेब म्हणतात, "जातिव्यवस्था ज्या धार्मिक श्रद्धांवर उभारलेली आहे, त्या श्रद्धा उद्ध्वस्त केल्याशिवाय जातिसंस्था नष्ट होणे आवश्यक आहे."[7]

बाबासाहेबांच्या म्हणण्यानुसार हिंदू धर्म हा तत्त्वप्रधान नसून नियमप्रधान आहे. नियमानुसार केलेले कृती निव्वळ यंत्रवत असते. धार्मिक विधी, वैदिक सूत्रे, कर्मकांड, व्रतवैकल्ये या पलीकडे हा धर्म समाजाला काहीही मार्गदर्शक करीत नाही. सोवळ्या ओवळ्याचे नियम, पूजा अर्चा हाच यांचा धर्म आहे. त्यामुळे हिंदूधर्म हा कधीच लोकधर्म होऊ शकत नाही. बाबासाहेब म्हणतात की, "जातिसंस्थेने समाजाचे विघटन व नैतिक अध:पतन केलेले आहे. हिंदूसमाज नावाचा समाज अस्तित्वात नसून ते अठरापगड जातीचे कडबोळे आहे."[8] बाबासाहेबांनी जातिभेदाचे तात्वीक आणि व्यावहारिक अशा दोन्ही दृष्टिकोनातून विश्लेषण केले. जातीभेदामुळे हिंदू समाजाचे संघटन होऊ शकलेले नाही. असा बाबासाहेबांचा निष्कर्ष आहे. बाबासाहेबांच्या मते जात ही मानसीक अवस्था आहे. विभिन्न जातीतील विवाहाने जातीभेदाला तडा जावू शकेल अशी बाबासाहेबांची धारणा होती.[9] जातीभेद अभेद्य आहेत कारण धर्मशास्त्राचा त्याला आधार आहे. धर्मशास्त्रांना झुगारल्याशिवाय जातियता नष्ट होणार नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते. म्हणून धर्मशास्त्रावरील श्रद्धा नष्ट करा असे बाबासाहेब म्हणतात.[10]

समाजात प्रचलीत जाती व वर्णव्यवस्थेचे अवलोकन व अनुभव बाबासाहेबांनी लहानपणापासून घेतले होते. म्हणूनच बाबासाहेब म्हणतात, "चातुर्वर्ण्यासारखी नीच व हलकट व्यवस्था दुसरी सापडणार नाही. हिच्यात लोकांची परस्पर मदतीची वृत्ती नष्ट होते आणि ते विकल, विकृत व मृतवत होतात."[11] ते पुढे म्हणतात, "कबुतराच्या खुराड्याप्रमाणे तुम्हाला माणसांना विशिष्ट वर्गात टाकता येणार नाही."[12] म्हणूनच बाबासाहेबांनी मुल्याधिष्ठीत समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी एकीकडे भारतीय राज्यघटना आणि दुसरीकडे बुद्ध धर्म यांचा पुरस्कार केला असे दिसून येते.

**निष्कर्ष :**

1) बुद्ध-बसव-फुले-आंबेडकर हे महान समाजसुधारक होते.
2) हे सर्वजण समताधिष्ठित समाजव्यवस्थेचे पुरस्कर्ते होते.
3) हे सर्वजण पुरोगामी विचारांचे मार्गदर्शक स्त्रोत आहेत.
4) हे सर्वजण एकाच विचारसरणीचे दीपस्तंभ आहेत.
5) या सर्वांचे जातीव्यवस्थेविषयक विचार व कार्य समान होते. फरक आहे तो फक्त काळाचा.
6) यांच्या कार्याची परिणीती म्हणजे आज बऱ्याच प्रमाणात जातीव्यवस्थेची बंधने लवचिक झाल्याची दिसून येतात.

**संदर्भ :-**

1) मेश्राम, वामन, जाती समाज को तोडने का वास्तविक हथियार, मुलनिवासी ट्रस्ट, नई दिल्ली, 2008, तिसरा संस्करण, पृ. 20
2) दोडमनी, प्रा. शालिनी, महामानव बसवण्णांची समग्र वचने, दोडमनी, श्रीशैल, उगार खुर्द, जि. बेळगाव, 2007, पृ. 73.
3) तत्रैव, पृ. 76-77
4) तत्रैव, पृ. 78
5) आगलावे, डॉ. सरोज, जोतिराव फूले : सामाजिक तत्वज्ञान, सुगावा प्रकाशन, पूणे 2003, प्रथमावृत्ती, पृ. 34
6) तत्रैव, पृ. 36
7) मेश्राम, केशव व इतर (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 2006, तृतीय आवृत्ती, पृ. 64
8) तत्रैव, पृ. 72
9) तत्रैव, पृ. 80
10) तत्रैव, पृ. 81
11) तत्रैव, पृ. 79
12) तत्रैव, पृ. 80